केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 62 | Marathi Daily | Tuesday 29/10/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेखः बाजारपेठेची दिवाळी पान २


ए.एच.पोखरणा ज्वेलर्सला दिवाळीच्या खास खरेदीसाठी ग्राहकांची पसंती पान ३


जैन वात्सल्य संस्थेतर्फे फराळाचे वाटप पान ५

### उठाठेव
– विवेक मेहेत्रे



'येतं वर्ष गेल्या वर्षासारखंच जावो' असा मजकूर असलेलं दिवाळी शुभेच्छा पत्र मला मिळाल्याने मला खूप भीती वाटतेय!!

### आ. जगताप यांचे दोन अर्ज; कळमकर, काळे, गाडे, फुलसौंदर, बोराटे यांचे अर्ज

# लोढा, कोतकर अपक्ष निवडणूक रिंगणात



(छाया : राजू खरपुडे)



(छाया :उदय जोशी)



(छाया : राजू खरपुडे)

**समाचार/नगर-दि.२९**

नगर शहर विधानसभा मतदारसंघासाठी महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. संग्राम जगताप यांनी आज पुन्हा दोन उमेदवारी अर्ज दाखल केले असून, महाविकास आघाडीचे उमेदवार माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी आज शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान, या मतदारसंघात महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. शरद पवार गटाचे उमेदवार माजी महापौर अभिषेक कळमकर यांच्यासह शिवसेनेचे जिल्हाप्रमुख (ठाकरे गट) शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे तसेच काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

त्याचबरोबर संदीप कोतकर यांच्या पत्नी माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. माजी महापौर संदीप कोतकर किंवा सुवर्णा कोतकर यांच्यापैकी कोणीतरी एकजण निवडणूक लढविणार असल्याचे सांगण्यात येत होते. अखेर सुवर्णा कोतकर यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केला आहे.

संदीप कोतकर किंवा सुवर्णा कोतकर हे निवडणूक लढविणार असून महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारीसाठी प्रयत्नशील असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. मात्र, शरद पवार गटाने शनिवारी (दि. २६) माजी महापौर अभिषेक कळमकर यांना उमेदवारी (पान ३ वर)

### भाजपाचे वसंत लोढा यांचाही अर्ज

भाजपाचे ज्येष्ठ नेते वसंत लोढा यांनी भाजपा आणि अपक्ष असे दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. लोढा यांच्या अर्जामुळे महायुतीतही बंडखोरी झाली आहे. यावेळी त्यांच्या समवेत मिलिंद गंधे, दिगंबर गेंट्याल, बंटी डापसे, संजय वल्लाकट्टी उपस्थित होते. नगर शहरात भाजपाची चांगली ताकद आहे. गेल्या ३० वर्षांपासून भाजपाच्या कार्यकर्त्यांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळालेली नाही. या मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढत व्हावी, अशी भाजपा कार्यकर्त्यांची मागणी आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही काही मतदारसंघात मैत्रीपूर्ण लढती होतील, असे स्पष्ट केले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्या सूचनेप्रमाणे पुढील निर्णय घेऊ, असे वसंत लोढा यांनी सांगितले.

### उमेदवारीमध्ये बदल नाही- फाळके

महाविकास आघाडीतर्फे शरद पवार गटाकडून माजी महापौर अभिषेक कळमकर यांची अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यावरून आघाडीच्या घटक पक्षांमध्ये उमेदवारी बदलून आणण्यासाठी प्रयत्न चालू असल्याची चर्चा होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी स्पष्ट केले की, अभिषेक कळमकर यांच्या उमेदवारीत बदल होणार नाही.






## निवडक

### आ. वनगा नॉट रिचेबल

**मुंबई, दि. २९–** शिवसेना (शिंदे) पक्षाचे विद्यमान आमदार श्रीनिवास वनगा यांना पालघर विधानसभेची उमेदवारी नाकारून भाजपमधून आयात उमेदवार राजेंद्र गावित यांना दिल्यानंतर श्रीनिवास वनगा आणि त्यांचे कुटुंबीय मानसिक दृष्ट्या प्रचंड व्यथित झाले आहे. श्रीनिवास वनगा हे सोमवारी संध्याकाळी सात वाजताच्या सुमारास कोणाला काहीही न सांगता अज्ञात वाहनातून घरातून निघून गेले असून १७ तासांपासून नॉट रिचेबल आहेत. त्यांचे कुटुंबीय आणि पोलीस यंत्रणा रात्रीपासून त्यांचा शोध घेत असून अजून पर्यंत ते कुठे आहेत याचा ठावठिकाणा लागलेला नाही. पालघर मध्ये नाही तर निदान डहाणू मधून उमेदवारी मिळेल या आशेवर असलेले वनगा यांना डहाणू मधून भाजपचे विनोद मेढा यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर जबर धक्का बसला.



### जो जे वांछील तो ते लाहो......

पसायदानातील या उक्तीप्रमाणे नगरमध्ये प्रत्येकजण स्वतःला जे सोईस्कर तेच करत असतो, विशेषतः रहदारीच्या बाबतीत. सिग्नल तोडून जाण्याची एवढी सवय नगरकरांना झाली आहे, की ती बदलणे अशक्य. म्हणूनच की काय सिग्नलने स्वतः ला बदलत नगरकरांवर नियम तोडण्याचे बालंट आणण्यापासून वाचविले. ज्यांना वाटते त्यांनी थांबा, ज्यांना जायचे ते त्यांनी जा. जो जे वांछील तो ते लाहो..! **(छाया– धनेश खत्ती)**

### नेवासा, श्रीरामपूर शिवसेनेला तर संगमनेरची जागा भाजपाकडे

# महायुतीच्या ३ जागांचा तिढा अखेर सुटला

**समाचार/नगर-दि.२९**







विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीत नगर जिल्ह्यातील रखडलेल्या ३ जागांचा तिढा अखेर सुटला असून संगमनेर मतदारसंघ भाजपाने स्वतःकडे घेतला आहे तर नेवासा आणि श्रीरामपूरची जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देण्यात आली. आता संगमनेर मतदारसंघात भाजपाचे अमोल खताळ हे उमेदवार असतील तर श्रीरामपूरमध्ये शिवसेनेने माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांना उमेदवारी दिली आहे. नेवासा मतदारसंघ भाजपाकडून शिवसेनेला गेला असला तरी तेथे भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे हे धनुष्यबाण चिन्हावर लढणार आहेत. दरम्यान, श्रीरामपूरचे विद्यमान आमदार लहू कानडे यांनी काल सोमवारी सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यांना राष्ट्रवादीची उमेदवारी पक्की समजली जात होती. मात्र, सायंकाळी श्रीरामपूर मतदारसंघातून माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांना शिवसेनेची उमेदवारी जाहीर झाल्याने आ. कानडे यांची मोठी अडचण झाली आहे. त्यामुळे आज आ. कानडे काय भूमिका घेतात, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. (पान ३ वर)

### नेवाशात दोन्ही शिवसेना आमने-सामने;
### श्रीरामपूरात कानडे राष्ट्रवादीत; जागा शिवसेनेला!



महायुतीत नगर जिल्ह्यातील ३ मतदारसंघाच्या जागावाटपात काल सोमवारी नाट्यमय घडामोडी झाल्या. नेवासा मतदारसंघ भाजपाने मित्रपक्ष शिवसेनेला दिला खरा मात्र उमेदवाराचा पुरवठा भाजपानेच केला. त्यामुळे नेवासा मतदारसंघात आघाडीच्या उद्धवसेनेचे उमेदवार विद्यमान आमदार शंकरराव गडाख विरुद्ध महायुतीच्या शिंदेसेनेचे उमेदवार विठ्ठलराव लंघे असा दोन्ही शिवसेनेतच चुरशीचा सामना रंगणार आहे. श्रीरामपूर मतदारसंघात काँग्रेसची उमेदवारी न मिळालेले आमदार लहू कानडे यांनी महायुतीची उमेदवारी मिळविण्यासाठी सोमवारी सकाळी मुंबईत अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला, मात्र संध्याकाळी महायुतीत श्रीरामपूरची जागा शिवसेनेला गेली. तेथे शिवसेनेने माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांची उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे आ. कानडे यांची मात्र मोठी अडचण झाली आहे. आता आ. कानडे अपक्ष उमेदवारी करणार का? याची चर्चा सुरू झाली आहे. संगमनेरमध्ये भाजपाने नगर दक्षिणेचे माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्याऐवजी विखे समर्थक अमोल खताळ यांना उमेदवारी दिली आहे. माजी खा. विखे संगमनेरमध्ये लढण्यास इच्छुक होते. या मतदारसंघात विखे यांनी जाहीर सभांना धडाका लावत प्रचारयंत्रणा राबविली होती. तेथे आता काँग्रसचे ज्येष्ठ नेते आ. बाळासाहेब थोरात विरुद्ध भाजपाचे अमोल खताळ असा सामना रंगणार आहे.

### दिवाळी, निवडणुकीमुळे मागणी वाढणार; तिप्पट खरेदीची आशा

# यंदा फटाके विक्रेते होणार मालामाल!

**समाचार/नगर-दि.२९**



दिवाळी पाठोपाठ उमेदवारांच्या प्रचारफेऱ्या व नेत्यांच्या सभा आणि त्यानंतर विधानसभा निवडणूक निकालाचा जल्लोष यामुळे यंदा फटाके विक्रेत्यांची खऱ्याखुऱ्या अर्थाने दिवाळी आहे. यामुळे नगर शहर व ग्रामीण भागात फटाक्यांच्या स्टॉलची संख्या वाढली असून फटाके विक्रेत्यांना मोठ्या उलाढालीची अपेक्षा आहे.

सोमवारपासून (दि. २८) दिवाळी सणाच्या उत्सवास सुरूवात झाली आहे. १ नोव्हेंबरला दिवाळीचा मुख्य दिवस म्हणजे लक्ष्मीपूजन आहे. दिवाळी म्हटली की, फटाक्यांची आतषबाजी. या सणाच्या पार्श्वभूमीवर शहर व उपनगरात फटाका मार्केट उभारण्यात आले आहे. लहान मुले, तरूण– तरूणी यांच्या दिवाळीनिमित्त फटाके उडवण्याचा अधिक उत्साह व आकर्षण असते. विविध प्रकारचे आकर्षक व आवाजामुळे लक्षवेधी फटाके बाजारात आले आहेत. त्यातच सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होऊन २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर केला जाणार आहे. दरम्यान, आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपल्यानंतर उमेदवारांच्या प्रचाराला गती येणार आहे. उमेदवारांच्या प्रचारफेऱ्या, नेत्यांच्या सभावेळी फटाके फोडले जातात. नोव्हेंबरच्या २३ तारखेला निकाल लागल्यावर विजयी उमेदवारांच्या मिरवणुकांच्यावेळी फटाक्यांची आतषबाजी होईल. त्यामुळे पुढील महिनाभर नगर जिल्ह्यात फटाक्यांची मागणी असेल. दिवाळी आणि निवडणुकीची धामधूम, यामुळे फटाक्यांच्या तिप्पट खरेदीची फटाके विक्रेत्यांना अपेक्षा आहे.

|| श्री ||
दिवाळी फराळ
५१ वर्षांची परंपरा जपत शुद्ध, पौष्टिक, पारंपारिक व घरगुती पद्धतीने बनविलेले फराळाचे पदार्थ..
सच्चिदानंद केटरर्स
प्रोप्रा. नरेंद्र कुलकर्णी
9822771199, 9420796195
शमी गणपती मंगल कार्यालय, दिल्लीगेट, अ.नगर

JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

फराळ आमचा,आनंद तुमचा
अतुट विश्वासाची स्वादमय परंपरा...
हेमराज
कोठी रोड, अहिल्यानगर.
Mob.: 99215 99216 | 9890298899
दिवाळी फराळ महोत्सव

संपादकीय

# बाजारपेठेची दिवाळी

दिवाळी म्हणजे सणांची महाराणी. भारतीय परंपरेमध्ये साधारणत: दर महिन्याला सणावारांची रेलचेल असली तरीही दिवाळी ती दिवाळीच! एरवी वर्षभर खरेदी होत असली तरी दिवाळीच्या निमित्ताने होणाऱ्या खरेदीला संपन्नतेचे काही वेगळेच कोंदण असते. ही खरेदी दाराच्या तोरणाबरोबरच बाजारपेठांमधील झगमगाटाने आणि तेथील आकर्षक सजावटीने प्रसन्नतेमध्ये लाखमोलाची भर घालते. थोडक्यात, रोजच्या शिऱ्यामध्ये आणि प्रसादामध्ये असतो तोच फरक नित्याच्या आणि दिवाळीनिमित्त होणाऱ्या खरेदीत असतो असे म्हणता येईल. म्हणूनच प्रत्येक दिवाळी नाविन्यमयी तशीच प्रत्येक दिवाळीचा बाजारही वैविध्याने भरलेला. चला तर, या दिवाळीत बाजाराचा नूर काय सांगतो, सूर कसा लागतो हे बघू या. आताची वेळ समस्त भारतीयांच्या खरेदीच्या उन्मादाची आहे. स्वाभाविकच दरवर्षीप्रमाणे आताही बाजारात ग्राहकांची लगबग वाढलेली दिसते आहे. दिवाळीदरम्यान ग्राहकांच्या वर्तनाचे मुख्य ट्रेंड समजून घेणे प्रत्येक व्यवसायासाठी महत्त्वाचे असते. हा अभ्यास बाजाराबरोबर समाजातील बदलत्या प्रवाहाचे चित्रही समोर मांडतो. त्या अनुषंगाने बघता लक्षात येते की, भारतात ९१ टक्के ग्राहक आता ऑनलाईन खरेदी करतात. त्यामुळेच ग्राहकांना घरबसल्या वा फावल्या वेळेत खरेदीची मुभा देण्यासाठी आणि समाधान वाढवण्यासाठी मोबाईल पेमेंट पर्याय आणि ऑप्टिमाईझ केलेल्या अॅप्सच्या गरजेवर भर देण्यात येत आहे. मोबाईलकेंद्रित ई-कॉमर्सच्या वाढत्या ट्रेंडसह व्यवसायांना अखंड मोबाइल खरेदीचा अनुभव देणे आता आवश्यक आहे. फॅशन, ऑटोमोबाईल आणि कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या विविध क्षेत्रातील आकर्षक ऑफर आणि सवलतींमुळे दिवाळीच्या खरेदीमध्ये ग्राहकांच्या खर्चात २०-२५ टक्के वाढ होते. ऑनलाईन खरेदीकडे ग्राहकांचा कल वाढल्यामुळे व्यवसायांना या व्यस्त हंगामाचा फायदा घेण्यासाठी डिजिटल मार्केटिंग प्रयत्न वाढवणे गरजेचे ठरले आहे. सणासुदीच्या हंगामासाठी प्रभावी धोरणे तयार करण्यासाठी, यासंबंधी व्यवसायांना मार्गदर्शन करण्यासाठी फॅशन, ऑटोमोबाईल आणि ग्राहक तंत्रज्ञान क्षेत्रातील अंतर्दृष्टीवर लक्ष केंद्रित करून दिवाळीच्या नवीनतम ट्रेंडची रूपरेषा ठरवली जात असल्याचे दृश्यही यंदा बघायला मिळत आहे. यंदाच्या दिवाळीत इलेक्ट्रिक वाहनांच्या दिशेकडे झुकणारा ओढा लक्षणीय म्हणावा लागेल. विशेषत: सणासुदीच्या काळात टिकाऊपणा आणि कनेक्टिव्हिटी हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून खरेदी होताना दिसत आहे. भारतीय किरकोळ उद्योगाने फॅशन आणि दागिन्यांच्या विक्रीत यंदा २०-२५ टक्के वाढ नोंदवली असून पारंपरिक आणि आधुनिक डिझाईन्सचा संगम साधणारी दागिन्यांची श्रेणी ग्राहकांना आकर्षित करताना दिसत आहे. याव्यतिरिक्त तंत्रज्ञानावर आधारित सामग्रीच्या खरेदीमध्ये ३० टक्के वाढ नोंदवली गेली आहे. यातूनच गॅझेट्स आणि स्मार्ट होम डिव्हाईसेसचा वाढता वापर स्पष्ट होतो. या खरेदीवर उत्सवाचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो आहे. दिवाळीमध्ये स्वत:साठी खरेदी होते तशीच आप्तस्वकियांसाठीही मोठ्या प्रमाणावर खरेदी होते. स्वाभाविकच ग्राहक भेटवस्तूंच्या खरेदीकडे मोर्चा वळवतात. यात खाद्यपदार्थ, गृहसजावट, फॅशन आणि जवळपास सर्व प्रकारच्या शॉपिंगमध्ये मोठी उलाढाल अनुभवायला मिळते. आपापले बजेट आणि आवडीनुसार ग्राहकवर्ग आपली भेटवस्तू आकर्षक करण्याच्या प्रयत्नात दिसतो. ही बाबही लोक सणाचा अनुभव सामायिक करण्यास उत्सुक असल्याचे अधोरेखित करुन जाते. दिवाळी हा दिव्यांचा सण असल्यामुळे दिव्यांचे नानाविध प्रकार भेटवस्तू म्हणून खरेदी करण्याकडे वाढता कल दिसत आहे. त्यासाठी अगदी साध्या धातूपासून चांदी वा त्यासारख्या मौल्यवान मिश्र धातूंच्या आकर्षक दिव्यांची मोठी रेंज बाजारात उपलब्ध आहे. सजावटीचे आकर्षक वेष्टन, मिठाई, पणत्या, रांगोळी आणि आकाशदिवे यासह ते सहर्ष भेट देण्याचा ट्रेंड वाढताना दिसत आहे. त्यातही पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याप्रती जागरुकता निर्माण झाल्यामुळे भेटवस्तू निवडताना हे भान राखले जात आहे. अनेक लोक एलईडी दिवे, नैसर्गिक रांगोळी आणि बायोडिग्रेडेबल सजावट निवडतात. भेटवस्तूंची देवाणघेवाण वैयक्तिकृत वस्तूंवरही लक्ष केंद्रित करते. नेहमीप्रमाणे यंदाही विविध प्रकारच्या चॉकलेट्सना मोठी मागणी दिसते आहे. सध्या बरेच वापरकर्ते इन-स्टोअर खरेदीला प्राधान्य देताना दिसत असले तरीही ते खर्चाच्या सवयींप्रती खूपच संवेदनशील आणि सावध असल्याचे निरीक्षणही तज्ज्ञ नोंदवतात. ग्राहक खरेदी करण्यापूर्वी बचतीला प्राधान्य देत असल्याचे स्पष्ट जाणवत आहे. एकूणच आर्थिक नियोजन आणि पैशाचे मूल्य यावरचा वाढता भर सूचित करतो की व्यवसायांनी एक मल्टी-चॅनल मार्केटिंग धोरण अवलंबणे गरजेचे आहे. यामध्ये आकर्षक ऑनलाईन जाहिराती आणि विक्री धोरणांसह आकर्षक फायद्यांचे चित्र समोर मांडणे गरजेचे आहे. यामुळे पारंपरिक खरेदीदार आणि बजेटच्या बाबतीत ठाम भूमिका असणारे ग्राहकही हात मोकळा सोडून खरेदी करण्यास प्रवृत्त होतील. वापरकर्त्यांच्या खरेदी आणि खर्च करण्याच्या सवयींबाबत बोलायचे तर ऑनलाईन खरेदीला प्राधान्य देणारांची संख्या २८.७ टक्के इतकी दिसत असून दुकानात खरेदी करायला आवडत असल्याचे मत ३५.६ टक्के ग्राहकांनी नोंदवले आहे. कोणत्याही विक्री योजनेच्या गुंत्यामध्ये वा प्रलोभनांमध्ये न अडकता कोणतेही उत्पादन पूर्ण किंमतीत खरेदी करण्यास प्राधान्य असण्याचे मत ६४.४ टक्के ग्राहकांनी नोंदवले आहे तर काहींनी चांगल्या ऑफरसाठी वाट पाहणे योग्य असल्याचे म्हटले आहे. अशांना विक्रीसाठी थोडी प्रतीक्षा करण्यास काहीही वावगे वाटत नाही. सध्याच्या महागाईच्या काळात घेतलेल्या प्रत्येक वस्तूचे योग्य पद्धतीने जतन करा आणि उत्पादन खरेदी करण्याआधी त्याचा वापर परिपूर्ण होणार असल्याची खात्री करा, असे २४.६ टक्के ग्राहकांचे म्हणणे आहे. त्वरित उत्पादने खरेदी करण्यासाठी इतर खर्चाचा त्याग करण्याची तयारी दाखवणाऱ्या ग्राहकांचीही संख्या मोठी आहे.

# शंभर रुपये किलो दराने दिवाळी फराळ



**समाचार/नगर-दि.२९**

भारतीय संस्कृतीमध्ये दिवाळी सर्वोच्च सण म्हणून साजरा केला जातो. या सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी संत तुकाराम महाराज प्रतिष्ठानच्या वतीने सर्वसामान्यांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने दिवाळी फराळ फक्त शंभर रुपये किलो या दराने उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष, माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी दिली.

या उपक्रमाचा शुभारंभ नुकताच वाकळे यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. सवलत दरातील फराळामध्ये लाडू, चकली, शेव, शंकरपाळे, चिवडा, आदी पदार्थ एक किलोच्या पॅकिंगमध्ये फक्त शंभर रुपये या दराने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच समाजातील अंध, अपंग, अनाथ व गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत फराळाचे वाटप करण्यात येत आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या सामाजिक बांधिलकीतून तसेच वंचित घटकांना दिवाळी सणाचा आनंद घेता यावा यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला असल्याचे वाकळे यांनी सांगितले.

# स्नेहबंध फौंडेशनतर्फे किल्ले बनवा स्पर्धा

**समाचार/नगर-दि.२९**

दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा जपण्याच्या उद्देशाने येथील स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी दिली.

दिवाळीत लहान मुले एकत्र येऊन विविध किल्ले साकारतात. लहान मुलांच्या कल्पकतेला वाव देणाऱ्या आणि आपल्या इतिहासाबद्दल जागरुकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला चालना देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्यांना या स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, पत्ता व मोबाईल नंबरसह ३ नोव्हेंबर पर्यंत ८७९३ १९१९१९ या क्रमांकावर मोबाइलवर काढलेला १ मिनिटाचा व्हीडिओ व २ ते ३ फोटो पाठवावे.(जुना व्हिडिओ चालणार नाही.) किल्ला दगडमातीचा असावा, पण सजावटीकरता अन्य वस्तू व रंग वापरता येतील. इकोफ्रेंडली किल्ला असल्यास त्यालाही विशेष गुण दिले जाणार आहेत. स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून पहिल्या तीन स्पर्धकांना मान्यवरांचा उपस्थितीत दिवाळी झाल्यानंतर गौरवण्यात येणार आहे. मागील विजेत्या स्पर्धकांना प्रवेश मिळणार नाही.

# संतांची दिवाळी

**संतगाथा**

घराघरात आनंद देणारी, आपसातलं प्रेम वाढवणारी, मनामनात आशेचा दीप लावणारी, उदासीनतेचा अंधार घालवणारी, समृद्धी आणणारी दीपावली प्रत्येकाला हवी हवीशी वाटते. आपल्या जीवनात कायम दीपावलीचा आनंद आरोग्य रुपाने, समाधानाने, आध्यात्मिक अनुभवाने समृद्ध व्हावा ही शुभेच्छा दीपावलीच्या या प्रकाशमय पर्वात आपल्याला समाचार समूहाच्या वतीने देते. खरोखर दिवाळी हा आबालवृद्धांच्या आनंदाचा महास्रोत आहे. पण संतांच्या बाबत असे म्हणावे लागेल की त्यांचा आत्मानंद हा सर्वांत मोठा आनंद आहे. त्याची तुलना इतर आनंदाशी होऊ शकत नाही. संतांनी दिवाळीच्या आनंदाची तुलना आपल्या आत्मिक आणि आध्यात्मिक आनंदाशी केलेली आहे. आजच्या लेखामध्ये संतांना दिवाळी कशी वाटते व केव्हा वाटते याचे काही निवडक श्लोक, अभंग आपण इथे वाचणार आहोत आणि आपल्याही जीवनामध्ये आपल्याला हा आध्यात्मिक प्रकाश सापडण्यासाठी या श्लोक/अभंगांचा आधार घेणार आहोत

पंढरपूरला नित्य कीर्तन प्रवचन यांच्या माध्यमातून, ज्ञानाचे दीप लावलेले असतात, म्हणजे पंढरपूरला रोजच दिवाळी असते, यावर संत निवृत्तीदास म्हणतात,

नित्यता दिवाळी, नाही तेथे द्वैत.

विठ्ठल भक्तीच्या एका धाग्याने सर्व जातीधर्माचे लोक बांधलेले असतात, येथे द्वैत नाही.

खरोखर, आपण पाहतो, वारकरी ज्या वेळी आषाढी कार्तिकीला विठूरायाचे दर्शन घेण्यासाठी जातात त्या वेळी किती आनंदात असतात.विठोबाच्या नामात दंग होऊन नाचत असतात. नामदेव ज्या वेळी पंढरपुरी कीर्तन करीत त्या वेळी ते म्हणत,

.बोलू ऐसे बोल, जेणे बोले विठ्ठल डोले,  
नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी

आपल्यातील शुद्ध जाणीव हेच ईश्वराचे रूप आहे. याचा साक्षात्कार, सगुणोपासनेतून, निर्गुणाकडे गेल्यावर संतांना झाला. संतांनी, सर्वसामान्य माणसांना यासाठी गुरूचे महत्त्व विषद केले. उपनिषदात गुरूचा अर्थ, अंधकार घालवणारा असा सांगितला आहे. अज्ञानाचा अंधार घालवणारा, ज्ञानाचा दिवा लावणारा तो गुरू.

ज्ञानेश्वर महाराजांनी निवृत्तीनाथांना गुरु केले होते. आपल्यातील चैतन्य अथवा शुद्ध जाणिवेचा त्यांना साक्षात्कार झाला. त्या वेळी त्यांनी अभंग लिहिला,

आजी सोनियाचा दिनू वर्षे अमृताचा घनू,  
हरी पाहिला रे, हरी पाहिला रे।।

तर ज्ञानेश्वरीत अध्याय पंधरावा मधील ओवी क्रमांक १२मध्ये ते लिहितात

'सूर्ये अधिष्ठिली प्राची ।  
जगा जाणीव दे प्रकाशाची ।  
तैसी वाचा श्रोतया ज्ञानाची ।  
दिवाळी करी ।।

संत नामदेवम् हणतात

विठोबाचे राज्य आम्हा नित्य दीपावली ।  
विष्णुदास नामा जीवे भावे ओवाळी ।।'तसेच  
'नामयाची धणी भुकेली ते धाली ।  
आनंद दिवाळी आजि झाली ।।'

आणि पुढील अभंग तर प्रसिद्धआहे

सण दिवाळीचा आला । नामा राऊळासी गेला..

संत एकनाथ म्हणतात- आजी दिवाळी दसरा । आलो विठ्ठलाच्या द्वारा ।।

पेशवेकालीन संत तुकाविप्र महाराज हे संत एकनाथ महाराजांच्या शिष्य परंपरेतील एक महान सत्पुरुष होते ते म्हणतात

सण दिवाळीचा गोड । तो उघड कीर्तने  
हरीनाम कथा जेणे । शोभा सणे दिवाळी  
धन्ये त्याचे कूळ धन्ये । जे कीर्तनी रंगले  
वेद श्रुतीचीया मते । कली सत्य कीर्तन  
जेथ घदेल हा रंग । पांडुरंग ते ठाई  
तुकाविप्र म्हणे सणी । य रंगणी असावे

संत तुकाराम म्हणतात

'तुका म्हणे (संत) आले घरा ।तोचि दिवाळी-दसरा ।

दुसर्या एका अभंगात ते म्हणतात, 'दसरा दिवाळी तोचि आम्हा सण ।भेटतील सखे संतजन।।

सद्गुरु समर्थ श्री रामदास स्वामी महाराज ! यांनी तर. समाजाविषयीच्या अपार तळमळीतून , विपुल वाङ्मय निर्मिती केली. अभंग, दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके, भीमरूपी स्तोत्र, अनेक आरत्या उदाहरणार्थ, सुखकर्ता दुखहर्ता ही गणपतीची आरती, लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा, ही शंकराची आरती, या आरत्या तर दिवाळी सणात उत्साहा बरोबर धार्मिक भावनाही जागृत ठेवतात.

संतांच्या मार्गदर्शक विचारांच्या साह्याने संत सज्ञनांच्या सहवासाने आपल्या जीवनात कायम दीपावलीचा आनंद भरून राहावा हीच सदिच्छा!

**- शारदा अनंत होशिंग**  
समर्थ सत्संग परिवार  
९४२०७४८७१८




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित ध्येय गाठू शकाल. पित्तविकाराचा त्रास संभवतो.शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीच्या संधी लाभतील.
- **वृषभ** : शुभ फलदायी कालावधी आहे. विवाहनिश्चिती सुकर ठरेल. गुंतवणुकीतून अपेक्षित लाभ होईल.
- **मिथुन** : नोकरीत भाग्योदयाचे योग आहेत. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **कर्क** : सुवार्ता कानी येईल. नोकरीविषयक मुलाखतीत यश मिळेल. रखडलेली सरकारी काम पूर्ण होतील.
- **सिंह** : महत्त्वाच्या घटनांनी समाधान लाभेल. व्यावसायिक प्राप्ती वाढत जाईल. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कन्या** : व्यावसायिक करार लाभदायक ठरतील. सहकुटुंब प्रवासाचे योग आहेत. विद्यार्थ्यांना यश लाभेल.
- **तूळ** : मोठ्या आर्थिक व्यवहारात लाभ होईल. महत्त्वाच्या भेटीगाठी समाधान देतील. बाकी चिंता नसावी.
- **वृश्चिक** : नोकरीत बदली-बढतीच्या हालचाली होतील. व्यवसायात अडचणी संभवतात. विचारानं रहावं.
- **धनु** : नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. जोडीदाराचं सहकार्य राहील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं.
- **मकर** : गुंतवणुकीबाबत सावध रहावं. व्यावसायिक प्राप्ती वाढेल. जुगारसदृश्य व्यवहार टाळायला हवेत.
- **कुंभ** : विवाहाचे प्रयत्न यशस्वी होतील. वास्तुविषयक गुंतवणूक फायदेशीर ठरेल. थोरांचा सहवास लाभेल.
- **मीन** : व्यवसायात तेजी राहील. आर्थिक अडचणीतून मार्ग निघेल. धार्मिक स्थळांची यात्रा समाधान देईल.

## दिनविशेष

### ३० ऑक्टोबर

- **१९०९** : प्रसिद्ध अणुवैज्ञानिक आणि भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा यांचा जन्मदिवस.
- **१९७४** : विख्यात गझल गायिका बेगम अख्तर यांचे निधन. त्यांना 'मलिका-ए-गझल' ही उपाधी देण्यात आली होती.
- **१९९५** : कै. शांताबाई हुबळीकर यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार ज्येष्ठ कलाकार मास्टर भगवान यांना जाहीर.
- **२०१५** : सचिन तेंडुलकर कारकिर्दीतील शेवटचा रणजी सामना खेळला.

## आरोग्यमंत्र – संकेतांकडे दुर्लक्ष नको

हृदयविकाराच्या झटक्याने मृत्युमुखी पडणाऱ्यांचं वाढतं प्रमाण ही भारतातली चिंताजनक बाब आहे. हा धोका लक्षात घेता हृदयविकाराच्या संकेतांकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखं नाही. ते जाणून घ्यायला हवे.



✻ हृदयविकाराचा झटका येण्याआधी थकवा येणं किंवा उत्साह कमी होण्यासारखी लक्षणं दिसू शकतात. हृदय पुरेशा प्रमाणात रक्त शुद्ध करू न शकल्यामुळे शरीराला ऑक्सिजनचा पुरवठा कमी होऊन थकवा येतो. श्वास घ्यायला त्रास होणं ही सुद्धा हृदयविकाराची लक्षणं असतात. ✻ फुफ्फुसात द्रवपदार्थ साचल्याने श्वास घ्यायला त्रास होतो. कफ, छाती जड होण्यासारख्या समस्या निर्माण होतात. ✻ आराम करताना, दैनंदिन कामं करताना किंवा झोपलेलं असतानाही श्वास घेण्यास अडचणी निर्माण होतात. फुफ्फुसात द्रवपदार्थ साचल्याने रक्तातल्या कार्बन डाय ऑक्साइडची जागा ऑक्सिजन घेऊशकत नाही. यामुळे ही समस्या निर्माण होते. ✻ छातीत दुखणं तसंच अस्वस्थता जाणवणं हे हृदयविकाराचं प्रमुख लक्षण आहे. थकवा, मळमळ, अपचन, तीव्र पोटदुखी ही देखील हृदयविकाराची लक्षणं असू शकतात. महिलांमध्ये ही लक्षणं प्रामुख्याने दिसून येतात. दंडामध्ये होणाऱ्या वेदनाही हृदयविकाराच्या झटक्याचं लक्षण ठरू शकतं. गरगरल्यासारखं वाटणं तसंच डोकेदुखी, अस्वस्थता, श्वास घ्यायला त्रास होणं अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. जबडा आणि गळ्यात वेदना होणं हे सुद्धा हृदयविकाराच्या झटक्याचं लक्षण असू शकतं.

## महत्त्वपूर्ण काही... – उपकरणांच्या मदतीने...

मंगळाच्या अभ्यासासाठी पाठवल्या गेलेल्या मार्स पाथफाईंडरमध्ये अनेक आधुनिक उपकरणं होती. त्यातील एक म्हणजे मार्स ऑरबायटर लेझर अल्टीमीटर. मंगळाच्या पृष्ठभागापासून यान किती दूर आहे याची नोंद ठेवण्यासाठी या उपकरणाचा वापर करण्यात आला होता. त्यासाठी हे उपकरण मंगळाच्या दिशेने दर सेकंदाला १० अधोरक्त किरणांची स्पंदनं पाठवत आणि परावर्तित झालेल्या स्पदनांना परत यानापर्यंत येण्यास किती वेळ लागतो आहे हे मोजत असे. मंगळाच्या पृष्ठभागापासून यानाच्या अंतराचं समजल्यामुळे मंगळाच्या पृष्ठभागवरील डोंगरदऱ्यांच्या उंची आणि खोलीचं मोजमाप करता आलं. ही माहिती अत्यंत महत्त्वाची होती. थर्मल एमिशन स्पेक्ट्रोमीटर या उपकरणाच्या मदतीने आपल्याला मंगळावरच्या वायू, द्रव आणि घन अवस्थेतील रेणूंची माहिती मिळण्यास मदत झाली. मंगळावर मोठ्या प्रमाणात ऑलिव्हीन खनीज असल्याचा मुख्य शोध या उपकरणामुळे लागला. ऑलिव्हीन हे मॅग्नेशियम, लोह आणि सिलीकेट्वं संयुग आहे. ऑलिव्हसारख्या हिरव्या रंगामुळे याचं नाव ऑलिव्हीन पडलं आहे.

## सल्ला मोलाचा – नव्या घरात काय हवं?

नवीन घरातील प्रवेश ही एक समाधानकारक बाब आहे. पण प्रवेशानंतरचे सुरूवातीचे काही दिवस मात्र कमालीचे त्रासदायक असतात. ✻ घर नवीन असो वा रिसेलचं, आपल्या गरजेप्रमाणे सोयी करुन घेण्यासाठी फेरफार करावा लागतो. त्यासाठी तुमच्याकडे वेगवेगळ्या आकाराचे खिळे, हातोडा, टेप आणि विविध पान्यांनी भरलेलं टूल किट असायलाच हवं. ✻ घर बदललं म्हणून मुलांच्या शाळा आणि इतर अॅक्टिव्हिटीज थांबत नाहीत. त्यामुळे घरात मुलांचं शाळा आणि इतर उपक्रमांचं सामान ठेवण्यासाठी आधी पर्याप्त जागा करावी. ✻ घर रिसेलचं असेल तर स्वच्छतेची तुमची परिमाणं तिथे नसतील. तुम्हाला तुमच्या पद्धतीप्रमाणे स्वच्छता करुन घ्यावी लागेल. यासाठी बेकिंग सोडा आणि व्हिनेगर कामी येईल. हे दोन घटक तुमचं स्वच्छतेचं काम हलकं करण्यास मदत करतील. ✻ सध्या आपल्याकडील बहुसंख्य उपकरणं वीजेवर चालतात. अशा वेळी चार्ज करण्यासाठी अधिक प्लग गरजेचे असतात. एक्स्टेंशन कॉर्डमुळे ही गरज भागते.

## पंचांग

**बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४**  
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,  
अश्विन कृ. १३, नक्षत्र : हस्त  
चंद्रराशी : कन्या, वैधृति योग  
सूर्योदय : ६.४०, सूर्यास्त : ०६.०४

## फॉरवर्डस

**आयुष्याचा जोडीदार मिळाला तरी मित्रांची संगत सोडू नये कारण...**


दोस्तों का होना भी जरूरी हैं जिंदगी में  
शाम को नुक्कड पर चाय पीने मेहबूब नहीं आते

## वाचा तर खरं

लहान मुलं दिवसा अधिक काळ झोपतात अशी बहुतांश पालकांची तक्रार असते तर मुलांच्या शारीरिक, मानसिक विकासासाठी दिवसातून पुरेशी झोप मिळणं आवश्यक ठरत असल्याचं तज्ज्ञांचं मत असतं. मात्र, दुपारची झोप वा डुलकी लहान मुलांच्या रात्रीच्या झोपेवर परिणाम करते असा निष्कर्ष ऑस्ट्रेलियातील क्विन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या संशोधकांनी काढला आहे. झोप आणि शारीरिक विकास तसंच संपूर्ण आरोग्य यांच्यात परस्पर संबंध असल्याचंही संशोधकांना दिसून आलं आहे.

## करिअरवाटा – डिझायनिंगचं आव्हानात्मक विश्व

आजच्या फॅशनविश्वात वैविध्यपूर्ण प्रावरणांबरोबरच आकर्षक अॅक्सेसरीजनाही अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळेच फॅशन इंडस्ट्रीमधली ही एक सहाय्यक शाखा आहे. त्यामध्ये वेगवेगळ्या अॅक्सेसरीजचं डिझाईन केलं जातं. ज्वेलरी, शूज, बॅग्स, ईअररिंग्जपासून विभिन्न वस्तू डिझाईन केल्या जातात. यासंबंधीचे अभ्यासक्रम काही महिन्यांच्या कालावधीपासून दोन ते तीन वर्षापर्यंत असतात. यामध्ये सेलफोनपासून इंटिरियर डेकोरेशनमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तूंपर्यंत विविध वस्तूंचं डिझाईन करण्याची मोकळीकही मिळते. त्यामुळे उमेदवार आवडत्या क्षेत्रामध्ये काम करू शकतो. प्रोडक्ट डिझाईन, फॅशन डिझाईन, ज्वेलरी डिझाईन, किचनवेअर्स आदींमध्ये भरपूर संधी आहेत. या क्षेत्रामध्ये येण्यासाठी भविष्याचा वेध घेण्याची क्षमता हवी. भविष्यातील बाजाराचा अंदाज घेता यायला हवा. रफ स्केच, प्रॉडक्शन, फिनिशिंग आणि पॅकिंग आदी पातळ्या ओलांडून उत्पादन बाजारात उतरवलं जातं. या प्रत्येक अवस्थेमध्ये उमेदवार काम करू शकतो. यामध्ये मार्केट रिसर्च हादेखील महत्त्वाचा मुद्दा आहे. हे एक आव्हानात्मक क्षेत्र आहे. पण त्यामुळेच यामध्ये कल्पक उमेदवारांना स्वत:चं वेगळं स्थान निर्माण करता येऊ शकेल.



## खेचाखेची – आज फायनल!

**रवी:** डॉक्टर, दर रात्री माझ्या स्वप्नात उंदीर येतात जे फुटबॉल खेळत असतात.

.

.

**डॉक्टर:** काळजी करु नका. हे औषध घ्या. स्वप्न पडणं बंद होईल.

.

.

**रवी:** औषध उद्यापासून सुरू करु का? आज फायनल आहे.

## वेगळे काही

उत्तर प्रदेशमधील महुआडाबर गावामध्ये भूतप्रेत आणि सैतानांची जत्रा भरते. येथील सय्यद अब्दुल लतीफच्या दर्ग्यामध्ये उपस्थित बाबा आपल्या शक्तीनं माणसांना पछाडलेल्या भूतांना आवाहन करतात, त्यांना खेळवतात आणि सरतेशेवटी संबंधित शरीर सोडून निघून जाण्यास विवश करतात. बाबांची शक्ती बाधित व्यक्तींच्या शरीरातील भूतांना नाचवते, त्यांना क्लेश देते. अशा पद्धतीनं दमल्यावर हे लोक जमिनीवर लोळण घेऊ लागतात. नंतर घरातील लोक त्यांच्या अंगावर चादर टाकतात. चादर पडताच या व्यक्ती शांत होतात. दर्ग्यामध्ये माथा टेकून नातेवाईक या व्यक्तींना घेऊन जातात. हा सगळा कार्यक्रम पाहण्यासाठी इथे देशी आणि विदेशी पर्यटकांची मोठी गर्दी असते.

## हेअर केअर – जपा केसांचं सौंदर्य

प्रखर उन्हाचा त्वचेला त्रास होतो तसंच उन्हामुळे केसांचंही नुकसान होण्याची शक्यता असते. हा धोका टाळण्यासाठी उन्हात केसांचं संरक्षण करणारे नैसर्गिक उपाय करता येतील. त्याविषयी जाणून घेऊ या.



✻ कोरफडीत सूर्याच्या अतिनील किरणांचा प्रभाव कमी करण्याची क्षमता असते. त्यामुळे सतत उन्हात जात असाल तर केसांना कोरफडीचा गर लावत रहा. कोरफडीचा ताजा गर केसांना लावून थोड्या वेळानंतर थंड पाण्याने केस धुवून घ्या. ✻ चहाचं पाणी हा केसांचं रक्षण करणारा आणखी एक उपयुक्त घटक आहे. पाण्यात थोडी चहा पावडर घालून उकळून घ्या. थंड होऊ द्या. आता हे पाणी गाळून घ्या. या पाण्याने केस धुवा. काही वेळ शॉवर कॅप घालून ठेवा. साधारण १५ ते २० मिनिटांनी साध्या पाण्याने केस धुवा. ✻ तिळाच्या तेलामुळेही केसांचं रक्षण होतं. कंगव्यावर तिळाच्या तेलाचे काही थेंब टाकावे आणि केस विंचरून घ्यावे. यामुळे केसांची चमक टिकून राहते. नैसर्गिक सनस्क्रीन बनवण्यासाठी खोबरेल किंवा बदामाच्या तेलात तिळाच्या तेलाचे काही थेंब टाकून केसांना मालीश करणंही उपयुक्त ठरतं.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४ पान ३

# विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती

**समाचार/नगर-दि.२९**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. पारनेर आणि नगर शहर विधानसभा मतदार संघासाठी ताई के यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून जागतिक बँक प्रकल्प विभागाचे सहायक अभियंता संदिप कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीगोंदा आणि कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघासाठी डी. रथ्ना यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून श्रीगोंदाचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी प्रज्वल जायभाये यांची नियुक्ती श्रीगोंदा करण्यात आली आहे.

अकोले आणि संगमनेर विधानसभा मतदार संघासाठी हौलीनलाल गौईटे यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे कार्यकारी अभियंता प्रदिप हापसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शेवगाव, पाथर्डी आणि राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी श्रीमती रंजीता यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, उपकार्यकारी अभियंता धनश्री शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीरामपूर आणि नेवासा विधानसभा मतदारसंघासाठी अरुण कुमार यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिर्डी आणि कोपरगाव विधानसभा मतदार संघासाठी कविथा रामू यांची निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९४२३७८७३३४ असा असल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

### त्रिपाठी पोलिस निवडणूक निरीक्षक

**निवडणूक आयोगाने जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी नागेंद्र नाथ त्रिपाठी यांची पोलिस निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक युवराज आठरे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.**

## आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत सी व्हिजीलवर तक्रार करा-जिल्हाधिकारी

**समाचार/नगर-दि.२९**

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू असून निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांनी सी व्हिजिल अॅपद्वारे तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे. या अॅपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर १०० मिनिटांत पहिली कार्यवाही करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल अॅप विकसित केले आहे. या मोबाईल अॅपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल अॅपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाकून तक्रार सबमिट करावे, असे जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे कळविण्यात आले आहे.

## डॉ.आठरे यांची निवडणुकीतून माघार

**समाचार/नगर-दि.२९**

डॉ अनिल आठरे यांनी निवडणुकीतून माघार घेत असल्याचे आज स्पष्ट केले. मी डॉ.अनिल आठरे पाटील ,अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छुक होतो. मी गेल्या ४० वर्षापासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या विचारधारेशी जोडून राहिलेलो आहे. शरदचंद्रजी पवार आणि माझे घनिष्ठ संबंध आहेत. शहराच्या विकासासाठी निवडणुकीत उतरायला पाहिजे, अशी माझी इच्छा होती आणि ती इच्छा मी शरदचंद्र पवार यांच्याकडे व्यक्त केली यावर त्यांनी मला तयारी करण्यास सांगितले होते.



निवडणुकीची तयारी म्हणून मी शहराच्या विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून मी गेल्या सहा महिन्यापासून लोकांमध्ये फिरून लोकांच्या अडचणी जाणून घेत होतो. शहराचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मी विकासाची ब्लू प्रिंट तयार केली होती. पुढचा भाग म्हणजे निवडणुकीची मी तयारी केली होती. परंतु पक्षाने २६ तारखेला जी यादी जाहीर केली त्यामध्ये माझे नाव आले नाही. त्यानंतर मी अपक्ष अर्ज भरावा असा आग्रह नागरिकांनी धरला. जो शहराच्या विकासाची ठोस भूमिका मांडेल त्याच्या बाजूने आपण राहू, अशी मी भूमिका घेतली.

उमेदवारी न मिळाल्यामुळे मी राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) पक्षाशी कोणतेही संबंध तोडलेले नाहीत. शरदचंद्र पवार आणि माझ्यात राजकारणाच्या पलीकडेही मैत्रीत्वाचे संबंध आहेत. अर्ज भरू नये असा कोणीही माझ्यावर दबाव टाकलेला नाही. मी माझ्या सत्सद विवेक बुद्धीला स्मरून हा निर्णय घेतलेला आहे. यानंतरही मी शहराच्या विकासासाठी कटिबद्धच राहील, असे आठरे यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे.

पान १ वरुन

## महायुतीच्या ३ जागांचा तिढा अखेर सुटला

नगर जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार जाहीर झाले. महायुतीने ९ उमेदवारांची घोषणा केली. मात्र, संगमनेर, नेवासा आणि श्रीरामपूर मतदारसंघाचा तिढा सुटत नव्हता. आज मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे काल सोमवारी सायंकाळी महायुतीच्या नगर जिल्ह्यातील ३ जागांचा तिढा अखेर सुटला. आता जिल्ह्यात महायुतीत भाजपा ६, राष्ट्रवादी ४ आणि शिवसेना २ जागांवर लढणार आहे. नेवासा मतदारसंघ भाजपाचा महायुतीच्या जागावाटपात ही जागा आता शिवसेनेकडे गेली आहे. परंतु उमेदवार मात्र भाजपाने दिला आहे. तेथे आता भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात उतरतील. लंघे आजच शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. नेवासा मतदारसंघात भाजपात उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच होती. माजी आ. बाळासाहेब मुरकुटे आणि लंघे दोघेही मुंबईत तळ ठोकून होते. इकडे शिवसेनाही नेवासा मतदारसंघासाठी आग्रही होती. त्यातूनच उमेदवार भाजपाचा पण चिन्ह शिवसेनेचे असा तोडगा महायुतीत निघाल्याची माहिती आहे. श्रीरामपूर मतदारसंघासाठी भाजपा आग्रही होता, मात्र ही जागा शिवसेनेकडेच जाण्याची शक्यता होती. याठिकाणी शिवसेनेतही उमेदवारीसाठी रस्सीखेच होती. कॉंग्रेसचे माजी आमदार भाऊसाहेब कांबळे यांनी यापूर्वीच शिवसेनेत प्रवेश करीत उमेदवारीची मागणी केली होती. शिर्डीचे माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी मुलासाठी उमेदवारी मागितली होती. त्यामध्ये कांबळे यांनी बाजी मारली आहे. जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या संगमनेर विधानसभा मतदार संघातून भाजपाचे अमोल खताळ यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. या मतदारसंघात नगर दक्षिणेचे माजी खासदार डॉ सुजय विखे यांच्या भाजपा उमेदवारीची मोठी उत्सुकता होती. मात्र भाजपा नेतृत्वाने सुजय विखे यांना उमेदवारी दिलेली नाही. त्यामुळे संगमनेर मतदारसंघात कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आ. बाळासाहेब थोरात विरुद्ध डॉ. सुजय विखे ही संभाव्य हायहोल्टेज लढत टळली आहे.

## लोढा, कोतकर अपक्ष निवडणूक रिंगणात

जाहीर केली होती. शरद पवार गटाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी (ठाकरे गट) बैठक घेऊन शिवसेनेच्या अस्तित्वासाठी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार प्रा. शशिकांत गाडे, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला तर किरण काळे यांनी कॉंग्रेस आणि अपक्ष असे दोन उमेदवारी अर्ज दाखल केले. विशेष म्हणजे विक्रम राठोड हे काळे यांच्या समवेत उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपस्थित होते. दरम्यान, सुवर्णा कोतकर या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी तहसील कार्यालय परिसरात आल्यानंतर त्या शरद पवार गटाकडून अर्ज भरणार की अपक्ष अर्ज भरणार, याची चर्चा सुरू झाली होती. अखेर त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. तोपर्यंत अभिषेक कळमकर यांनीही उमेदवारी अर्ज भरला नव्हता. कोतकर यांच्यानंतर कळमकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. जनतेच्या आग्रहखातर आणि माजी महापौर संदीप कोतकर यांनी केलेल्या विकास कामांमुळे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असल्याची प्रतिक्रिया सुवर्णा कोतकर यांनी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, सचिन डफळ यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# गावठी कट्टा विक्रीसाठी आलेल्या दोघांना एलसीबीने पकडले



**समाचार/नगर-दि.२९**

गावठी कट्टा विक्रीसाठी कारमधून नगर शहरात आलेल्या दोन युवकांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पकडले. त्यांच्या ताब्यातून एक गावठी कट्टा, एक जिवंत काडतुस व कार (एमएच १४ ईसी ९७९१) असा ७ लाख ३१ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. रविवारी (२७ ऑक्टोबर) रात्री पावणे आठच्या सुमारास सावेडी उपनगरातील तपोवन रस्त्यावर पोलिसांनी ही कारवाई केली. मुदस्सर सादिक सय्यद (वय २०, रा. सरकारी दवाखान्याजवळ, पाथर्डी) व विनोद विजय वाघमारे (वय १९ रा. गोकुळ कॉलनी, कॉलेज रस्ता, राहुरी) अशी पकडलेल्या युवकांची नावे आहेत. पोलीस अंमलदार संदीप दरंदले यांच्या फिर्यादीवरून दोघांविरूध्द तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पांढऱ्या रंगाच्या कार मधून दोन युवक गावठी कट्टा विक्री करण्यासाठी तपोवन रस्ता परिसरात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संदीप पवार, गणेश भिंगारदे, ज्ञानेश्वर शिंदे, दरंदले, महादेव भांड यांच्या पथकाने रविवारी रात्री पावणे आठच्या नमूद ठिकाणी भेट दिली असता एक संशयित कार दिसून आली. पोलिसांनी कार मधून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांच्याकडे एक गावठी कट्टा, एक जिवंत काडतुस व कार असा मुद्देमाल मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील करत आहेत.

### शहरातील उद्योजकांशी साधला संवाद

# औद्योगिक प्रकल्पांसाठी प्रयत्नशील-जगताप

**समाचार/नगर-दि.२९**




औद्योगिक क्षेत्राल चालना देण्यासाठी महायुती सरकारने नगरमध्ये एकरच्या जागेसह नव्या एमआयडीसीला परवानगी दिली आहे. त्यामुळे नवे मोठे औद्योगिक प्रकल्प नगरमध्ये आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हा प्रकल्प नगरसाठी बुस्टर डोस ठरणार असून मोठ्या प्रमाणात लहान उद्योगांना चालना व रोजगार वाढणार आहे. इंडस्ट्रीयल इस्टेट या औद्योगिक वसाहतीचे अनेक प्रश्न व समस्या मांडल्या गेल्या. त्यातील अनेक सोडवल्या आहेत. अंतर्गत रस्ते कॉंक्रीटचे झाली असल्याने येथे वर्दळ वाढणार आहे. शहराचा चहूबाजूंनी सर्वांगीण विकास होत असल्याने चांगल्या नागरी सुविधा मिळत असल्याने शहरात लोकवस्ती वाढत आहेत. या विकासाच्या चाकाची गती वाढवण्यासाठी सर्वांनी एकेक पॅडल मारणे आवश्यक आहे. यासाठी या निवडणुकीत मला पुन्हा एकदा आपला आशीर्वाद द्यावा, असे आवाहन महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी केले.

विधानसभा निवडणुकीचे महायुतीचे उमेदवार आ.संग्राम जगताप यांनी नगर विकास यात्रेत इंडस्ट्रीयल इस्टेट मधील उद्योजकांशी संवाद साधून निवडणुकीतील आपली भूमिका मांडली. यावेळी अहमदनगर इंडस्ट्रीयल इस्टेटचे चेअरमन अरविंद गुंदेचा यांनी आ.जगताप यांचे स्वागत करून सत्कार केला. यावेळी उपाध्यक्ष निलेश मेहेर, संचालक संतोष बोथरा, मेहुल भंडारी, संतोष बोरा, नितीन पटवा व सतीश बोरा, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे व संजय चोपडा आदींसह इंडस्ट्रीयल इस्टेटमधील उद्योजक उपस्थित होते.

इंडस्ट्रीयल इस्टेटचे अध्यक्ष अरविंद गुंदेचा यांनी आ.जगताप यांना तिसऱ्यांदा शहराचे आमदार करण्यासाठी इंडस्ट्रीयल इस्टेट मधील सर्व उद्योजक आपल्या परिवार व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या मागे उभे असल्याची ग्वाही दिली.

प्रास्तविकात संतोष बोरा यांनी इंडस्ट्रीयल इस्टेट मध्ये आ. जगताप यांनी केलेल्या कामांची माहिती दिली. नितीन पटवा यांनी आभार मानले.

## अपघातात जीप चालकाचा मृत्यू

**समाचार/नगर-दि.२९**

जिप व ट्रॅव्हल्सच्या अपघातात जीप चालकाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (२७ ऑक्टोबर) पहाटे छत्रपती संभाजीनगर ते नगर रस्त्यावर घडली. सुखदेव बिंदूजी नागले (मूळ रा. हिवरखेड, ता. मोहर्शी, जि. अमरावती, हल्ली रा. समृध्दी नगर, वाकोडी रस्ता, ता. नगर) असे मयत जीप चालकाचे नाव आहे. त्यांचे पुतणे धनराज प्रभाकर नागले (वय ३२, रा. हिवरखेड, ता. मोहर्शी, जि. अमरावती, हल्ली रा. धानोरी, पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुखदेव नागले हे संभाजीनगरकडून नगर येथील घरी त्यांच्याकडील जीपने घेत असताना नगरकडून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी ट्रॅव्हल्सला जिपची धडक बसून अपघात झाला. या अपघातात सुखदेव नागले यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## हंडीनिमगावमध्ये गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

**समाचार/नगर-दि.२९**

हंडी निमगाव (ता.नेवासा) येथे गावठी कट्टा बाळगणारा तरूण स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केला. पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना माहिती मिळाली की, एक इसम बेकायदेशीरपणे गावठी कट्टा बाळगत असून सध्या तो हांडी निमगाव (ता. नेवासा) येथे आहे. त्यानुसार पोनिदिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर शिंदे, गणेश भिंगारदे, फुरकान शेख, संदीप दरंदले, सोमनाथ झांबरे, किशोर शिरसाठ, मनोज गोसावी, रमीजराजा आतार, मेघराज कोल्हे यांचे पथक तयार करून कारवाई करण्याची सूचना केली. पथकाने छत्रपती संभाजीनगर ते नगर रोडवर हंडी निमगाव येथे संशयीत इसमाचा शोध घेऊन, त्यास ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव सागर निवृत्ती शिंदे (वय २१, रा.सलबतपूर, ता.नेवासा) असे असल्याचे सांगितले. त्याच्या अंगझडतीत ३० हजार रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा व ५०० रुपये किंमतीचे १ काडतूस असा एकूण ३० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

### मुंबई शेअर भाव

**धनत्रयोदशीला शेअरबाजारातही लाभ**

**सेन्सेक्स ३०० ने उंचावला**

(शेअर सबब्रोकर)

अशोक पटवा

फोन-२४५२५२७, २४५२२६४

मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २९-१०-२०२४**

**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ८०१७५ |
| एसीसी | २३२०-२१ |
| एशियन पेंट | २९९१-९२ |
| बजाज ऑटो लि. | ९७४०-४१ |
| बलराम फूड चिनी | ६४४-४५ |
| भारत फोर्ज | १३७४-७५ |
| क्रॉम्प्टन | ३८६-८७ |
| डीएलएफ | ६३२-३३ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२६९-७० |
| ग्रॅफाईट इंडिया | ५०४-०५ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २६४१-४२ |
| आयटीसी लि. | ४८८-८९ |
| एल अॅण्ड टी लि. | ३३७०-७१ |
| रिलायन्स इंड. | १३३४-३५ |
| एसबीआय | ८२०-२१ |
| टाटा मोटर्स | ८३७-३८ |
| टाटा स्टील | १४८-४९ |
| टीसीएस | ४०८१-८२ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २५३-५४ |
| सुवेन फार्मा | १२५३-५४ |

# धांदरफळ घटनेस विखेच जबाबदार - आ. थोरात

**समाचार/नगर-दि.२९**



डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यावर झालेली टीका ही एकटीवर नसून तमाम माता भगिनींवर आहे. या घटनेला तुम्हीच जबाबदार असून दहशत खरी राहता तालुक्यात आहे .एक वेळ विकासाबाबत आणि दहशतीबाबत तुलना होऊन जाऊ द्या, असे आमदार बाळासाहेब थोरात यांनी विखे यांच्यावर नाव न घेता केली.

लोणी खुर्द येथील लोमेश्वर मंदिर परिसरात प्रभावती घोगरे यांचा अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने झालेल्या विजय संकल्प मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खा.भाऊसाहेब वाकचौरे, खा.निलेश लंके, डॉ.सुधीर तांबे, प्रभावती घोगरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, ड.नारायण कारले, सरपंच जनार्दन घोगरे,राजेंद्र घोगरे, विजय दंडवते, शीतल लहारे,सचिन चौगुले,सुधीर म्हस्के,सिमोन जगताप, गणपतराव सांगळे, उत्तम आहेर उपस्थित होते.

आ. थोरात म्हणाले की, सध्या राज्याचे लक्ष हे संगमनेर आणि शिर्डी विधानसभा मतदारसंघाकडे लागले आहे. सर्वसामान्य जनतेमध्ये आनंद निर्माण करण्यासाठी ही लढाई आहे. तुम्ही वसंत देशमुखला आमचे नेते म्हणतात. महिला भगिनींचा अपमान करणाऱ्या तुमच्या प्रवृत्तीला आमच्या महीलांनी जाब विचारला तर तुम्ही पळून गेला. त्यावेळेस तुम्ही कार्यकर्त्यांना विसरले.

खा.निलेश लंके म्हणाले की, संपूर्ण राज्यामध्ये सुसंस्कृत नेता म्हणून आमदार बाळासाहेब थोरात यांना ओळखले जात आहे.प्रवरा परिसरात त्यांची मोठी दहशत आहे. ही दहशत कायमची संपविण्यासाठी सर्वांनी प्रभावती घोगरे यांच्या पाठीशी उभे राहा. २३ नोव्हेंबर नंतर राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार येणार आहे तेव्हा प्रशासनाने आमच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करू नका. दडपशाही करू नका अन्यथा उलटी गिनती आम्ही करू शकतो.

समाचार

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सिंहाचा वाटा

**समाचार/नगर-दि.२८**



गेली अनेक वर्षे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा अशी मागणी करण्यात येत होती पण ही मागणी पूर्ण होण्यास अखेर २०२४ साल उजडावे लागले. महाराष्ट्राचे लोकप्रिय यशस्वी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सततच्या पाठपुराव्याचे हे यश असून त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कारकिर्दीतील हे यश मानाचा तुरा ठरले आहे. सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेचा गौरव करतांना म्हंटले आहे की, मराठी भाषा हा देशाचा अभिमान आहे. या उत्तुंग भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळायलाच हवा होता, देशाच्या इतिहासात मराठी भाषेचा समृद्ध सांस्कृतिक वारशाचं योगदान या सन्मानामुळे अधोरेखित झालं आहे. भारताच्या परंपरेत मराठी कायमच अत्यंत महत्त्वाची आहे. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे अनेक लोकांना मराठी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळेल.

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणतात की, अभिजात भाषा या भारताच्या पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करतात. तसंच प्रत्येक समुदायाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते, यामुळे हा दर्जा मराठी भाषेला मिळावा यासाठी अनेक वर्षांपासून प्रयत्न सुरू होते.

माझा मराठाचि बोलु कौतुके। परि अमृतातें ही पैजा जिंके समस्त मराठी जनांचे हार्दिक अभिनंदन!!! अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी मराठी भाषेचा अभिमान व्यक्त केला आहे.

ते म्हणतात अखेर माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला! एका लढ्याला यश आले. यासाठी महाराष्ट्र सरकारने केंद्राकडे सतत पाठपुरवठा केला होता. आपल्या लाडक्या भाषेचा यथोचित सन्मान केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानताना मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी या कामात अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांबद्दलही कृतज्ञता व्यक्त केलेली आहे.

लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू अशा अनेक ग्रंथाचा आधार घेत मराठी भाषा ही अभिजातच आहे, हे सिद्ध करण्यासाठी अनेक थोरा-मोठ्यांचे, अभ्यासकांचे यासाठी हातभार लागले. मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. एक लढाई यशस्वी झाली. अभिजात भाषेचा दर्जा मिळवण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. मराठीने हे सर्व निकष पूर्ण केले आणि म्हणून तिचा दर्जा अभिजात भाषांमध्ये समाविष्ट केला गेला. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे आता मराठी भाषेचे संरक्षण, संशोधनासाठी आणि संवर्धनासाठी निधी मिळेल यामुळे मराठी भाषेच्या जतनासाठी आणि प्राचीन साहित्याच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन मिळेल. शोधकार्याला प्रोत्साहन म्हणून अभिजात भाषांवर संशोधन करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर विशेष अनुदाने आणि शिष्यवृत्त्या दिल्या जातील. मराठी भाषेतील प्राचीन साहित्य, संस्कृती, आणि इतिहास यांचे अधिकाधिक शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश होईल, ज्यामुळे मराठीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेचा अधिक सखोल अभ्यास करता येईल. अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा दर्जा उंचावला गेला आहे आणि तिच्या जतनासाठी आणि प्रसारासाठी अनेक नवे मार्ग खुले झाले आहेत हे लाभ लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी हा विषय लावून धरला ज्याला यश मिळाले.

## माणुसकीची भिंत उपक्रमास सावेडीत प्रतिसाद

# दुसऱ्यांच्या सुखात स्वत:चा आनंद शोधा- सुखटणकर

**समाचार/नगर-दि.२९**




माणसाने माणुसकी हा धर्म पाळला तर समाजातील सर्व जाती धर्मात सर्व धर्म समभाव निर्माण होईल. एकमेकांचे सुखदुःख वाटून घेण्यात मानवधर्म आहे. त्यामुळेच नको असेल ते द्या. हवे असेल ते घेऊन जा. या माणुसकीची भिंत संकल्पनेला दिवाळी सणात गोरगरीब, वंचित कुटुंब, गरजूंना मोठा आधार मिळाला आहे. दुसऱ्यांच्या सुखात स्वतःचा आनंद शोधा म्हणजे दुःखी कोणी राहणार नाही. असे प्रतिपादन उद्योगपती चिन्मय सुखटणकर यांनी केले आहे.

सावेडी येथे जॉगिंग ट्रॅकवर गरजूंना कपडे वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. १००ते १५० जणांनी लाभ घेतला याप्रसंगी चिन्मय सुखटणकर, डॉ. दत्ता पोंदे, प्रसाद मांढरे, ईश्वर सुराणा, विनोद साळुंकी, प्रमोद छाजेड, दिलीप कोठारी, सवंगडी ८२ ग्रुप, स्नेह ७५ ग्रुप, एमआयडीसी उद्योजक ग्रुप लायन्स क्लब मिडटाऊनचे सदस्य उपस्थित होते. डॉ. पोंदे म्हणाले नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा. ही संकल्पना मला सुचली या आधारे माणुसकीची भिंत म्हणून गरजूंना आधार देण्यासाठी आवाहन केल्याप्रमाणे ग्रुपच्या सदस्यांसह नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर कपडे देऊन सहभाग नोंदविला. आज या उपक्रमात शंभर ते दीडशे गरजू लोकांना त्याचा लाभ झाला. या वेळी योगेश श्रोत्रीय, धिरेन भळगट, संजय आहेर, रजनी ढोरजे, डॉ. अस्मिता अष्टेकर, आरती खाडीलकर, रचना काकडे, नितीन काकडे, सागर अष्टेकर, संपूर्णा सावंत उपस्थित होते.

## पैलवान चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

# एच.एस.के संघ विजयी

**समाचार/नगर-दि.२९**

नगर शहरातील कोठला येथील पार्किंग येथे तीन दिवसीय पैलवान चषक भव्य टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शहरातील १६ संघांनी सहभाग नोंदविला होता. या टूर्नामेंटमध्ये अंतिम सामना एच.एस.के संघ व के.जी सरकार संघ यांच्यात रंगला या सामन्यामध्ये पैलवान चषक २०२४ चा मानकरी एच. एस.के संघ ठरला व संघमालक हाजी शमस खानयांना प्रथम २१ हजार २१२ रुपये व सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र देण्यात आले.




द्वितीय के.जी सरकार संघाचे युसुफ शेख ११ हजार १११ सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. तृतीय हेड अँड टेल संघास ५ हजार ५५५ सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी उद्योजक अफजल शेख, असलम शेख, फरहान शेख, गुलाम शेख, अझर दादा, अयाज शेख, नितीन बुरला, फैयाज सय्यद, अब्दुल्ला खोकर, हर्षल कांबळे, सतीश सातपुते, मुस्ताक शेख, शाहरुख शेख, पुंडे, अकबरभाई मुंबईवाले, एहसान पार्टी, फैजल पैलवान, शाहिद पैलवान, शाहरुख जमजम, समीर बागवान, नइम सरकार, राजू भाई, फैरोज कुरेशी, फयाज केबलवाला, हाजी शमस, आफताब शेख, वसीम शेख, अजर शेख, सद्दाम शेख, आतिफ शेख, हाजी लाला, परवेज शेख, गुलाब भाई, जोयब शेख, शशी भाई, आदीसह अफजल भाई फ्रेंड सर्कलचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पैलवान चषक भव्य टर्फ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेमध्ये मॅन ऑफ द मॅच देवीश बडे तर मॅन ऑफ द सिरीज हमजा सय्यद यांना देण्यात आले.

# धनादेश अनादर प्रकरणी राहुल गांधी यांना शिक्षा

**समाचार/नगर-दि.२९**

धनादेश न वटता परत आला म्हणुन आरोपी राहुल अशोक गांधी (रा. महाजन गल्ली, नगर) यास अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी एम. ए. एम. हुसेन यांनी दोषी ठरवून ६ महिन्याची शिक्षा सुनावली व १७ लाख रुपये दंड आकारण्यात आला.

३० दिवसात दंड न भरल्यास अजून ६ महिने कैद अशी शिक्षा सुनावली. लंडनमध्ये स्थायिक असलेले संदीप बाफना हे नगरला आले असताना, राहुल गांधी यांनी पांढरीपूल येथील त्यांच्या वडिलांच्या असलेल्या १० गुंठ्यांचा प्लॉट संदीप बाफना यांना विकण्यासाठी त्यांच्याकडून १० लाख आणि ५ लाख अशी रक्कम साठेखत आणि पुरवणी साठेखत करून घेतली. परंतु प्लॉटची खरेदी देण्यास बऱ्याच महिने वारंवार टाळा टाळ राहुल गांधी करत होते. घेतलेली रक्कम परतफेड करण्यासाठी राहुल गांधी ह्यांनी संदीप बाफना यांना दिलेले १० लाख आणि ५ लाखचे धनादेश न वटता परत आल्याने न्यायालयात खटला दाखल केला होता.

या गुन्ह्यात न्यायालयाने वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली. फिर्यादीतर्फे अ‍ॅड. राजेंद्र शेलोत, अ‍ॅड. हर्षल शेलोत, एड. कृष्णाली शेलोत यांनी काम पाहिले.

## हॅलो डॉक्टर

# संतुलित आहाराचे महत्व



सुदृढ शरीर आणि निरोगी मन हिच खरी आरोग्याची संपत्ती, आरोग्याची खरी गुरुकिल्ली आहे. आपलं जीवन सुखी आणि आनंदी असावं असं प्रत्येकालाच वाटत. त्यासाठीच आपलं शरीर निरोगी असणं अत्यंत गरजेचं असत. महात्मा गांधीजींनी सांगितलं होत की, आपलं शरीर हे एक साधन आहे, त्यासाठीच आपल्या शरीराची आपण काळजी घ्यायला हवी. एखादी गाडी जर भरधाव वेगाने धावण्यासाठी त्यामध्ये जसे भेसळमुक्त इंधन असावं लागत तसेच शरीररूपी गाडी सुरळीत चालण्यासाठी संतुलित आहाररूपी इंधनाची प्रत्येकालाच गरज असते. एखाद मुलं असो, तरुण, प्रौढ व्यक्ती, वृद्ध व्यक्ती, व्यावसायिक, विद्यार्थी, कामगार, शेतकरी किंवा कोणी खेळाडू प्रत्येकाच्या आहाराच्या गरजा या वेगवेगळ्या असू शकतात. मात्र हा आहार संतुलित असणं मात्र सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचं असत. हा संतुलित आहार म्हणजे नेमका कोणता आहार? तो कसा असावा? हेच जाणून घेण्यासाठी आहारतज्ज्ञ डॉ. अनघा पालेकर यांच्याशी साधलेला संवाद.

**संतुलित आहार म्हणजे काय? आणि संतुलित आहाराचे नेमके महत्त्व काय?**

आपल्या रोजच्या आहारामध्ये म्हणजे अगदी सकाळच्या नाश्त्यापासून ते दुपार आणि संध्याकाळच्या जेवणात विविध घटकांचा समावेश असणं आवश्यक असतं. यामध्ये धान्य, कडधान्य, तेलबिया, डाळी, भाजा, जेव्हा हे सर्व घटक आपल्या आहारात संतुलित म्हणजेच समप्रमाणात असतात तेव्हा त्या आहाराला आपण संतुलित आहार म्हणतो. या आहारातून आपल्या शरीराला कार्बोहायड्रेट्स, प्रथिन, कर्बोदके असे शरीराच्या वाढीसाठी अत्यंत आवश्यक असणारे घटक मिळतात.

**सध्याच्या आपल्या आहाराबद्दल काय दिसत? या आहारात कोणकोणत्या गोष्टींची कमतरता आढळते?**

लोकांचं हल्ली बाहेरच खाण्याचं प्रमाण हे खूप वाढलेलं दिसतंय. बाहेरच जंकफूड,फास्टफूड लोक मोठ्या प्रमाणात खातात. यामध्ये तेलकट पदार्थ, बेकरीचे पदार्थ आणि विविध प्रकारच्या कृत्रिम रसायनांचा समावेश असलेले पदार्थ लोक मोठ्या प्रमाणात खातात. मात्र, त्याच वेळी त्यांच्या घरच्या जेवणात मात्र फळ आणि भाज्यांचा समावेश खूपच कमी आढळतो. आहारात साखरेचं, तेलाचं आणि मैदायुक्त पदार्थांचा सातत्याने आणि मोठ्या प्रमाणात समावेश झाल्यानेच भाजा आणि फळांच्या कमतरतेमुळे कॅल्शियम, आयर्न, बी कॉम्लेक्स आणि इतरही घटकांची कमतरता शरीराला भासते. परिणामतः विविध आजारांना निमंत्रण मिळतं.

**संतुलित आहाराच्या दृष्टिकोनातून आपल्या रोजच्या आहाराच प्रमाण नेमकं किती आणि कसं असावं?**

आपल्या दैनंदिन नियमाप्रमाणे आपण रोज सकाळचा नाश्ता, दुपारचं जेवण आणि त्यानंतर संध्याकाळचं जेवण घेतो. या तीन जेवणामध्ये आपण भरपूर प्रमाणात आहार घेतो. परंतु, आहाराच्या एकूण ४ वेळा असाव्यात, यामध्ये सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण, मग संध्याकाळचा नाश्ता आणि शेवटी रात्रीचे जेवण. विविध वयोगटानुसार आहारात बदल होत असला तरी अशा ४ वेळा आपण थोडं थोडं अन्न घेतले तर तो संतुलित आहार असतो. आपल्या आहारात कर्बोदके करिता धान्याचा म्हणजे चपाती, भाकरी, उपमा, पोहे याचा नाश्त्यामध्ये तर दूध आणि दुधाचे पदार्थ, अंडी यांचा प्रथिनाकरिता आणि तंतुमय पदार्थांचा फळ आणि भाजा करिता अर्थात फायबर मिळण्यासाठी नेहमी समावेश असावा. यामुळे शरीराला आवश्यक सर्व घटकांची पूर्तता होते.

**हृदयरोगाने त्रस्त असलेल्या विविध रुग्णांसाठी संतुलित आहार कसा असावा?**

हृदयरोग्यांनी नेहमी रक्तदाबाची काळजी घेणं गरजेचं आहे. रक्तामध्ये असलेल्या लिपिड प्रोफाईलची काळजी अत्यंत आवश्यक असते. अशा रुग्णांनी मैदायुक्त पदार्थ खाणे टाळावेत. ज्वारी, नाचणी, बाजरीची भाकरी अशा रुग्णांना उत्तम. शिवाय आहारात वेगवेगळ्या उसळीचा समावेश असावा. दूध आणि दूधयुक्त कमी चरबीचे पदार्थ थोड्या प्रमाणात खाऊ शकता. आहारात तेलाचा कमीतकमी वापर करावा. कोलेस्ट्रॉलचे प्रमाण संतुलित राखण्यासाठी शेंगदाणा तेल किंवा राईस ब्रान तेल उत्तम. आहारात जास्तीत जास्त पालेभाज्या आणि फळांचा समावेश हा नियमित असायलाच हवा.

# शरीराची प्रतिकारशक्ती वाढविणारे तीळ

## वनौषधी गुणौषधी

मकरसंक्रांतीला तिळाचे अतिशय महत्व असते. त्यामुळे तर या सणाच्या निमित्ताने तिळापासून अनेक पदार्थ बनवले जातात. तीळ आणि गूळ यांना एकत्र करुन त्यापासून अनेक चविष्ट खाद्यपदार्थ बनवले जातात. गुळाचा तिळासोबत वापर केल्याने त्या पदार्थामध्ये पोषणमूल्यांची चांगलीच वाढ होते. तिळामध्ये भरपूर प्रमाणात पोषणतत्वे असतात. त्यामुळे तिळाला आरोग्यासाठी लाभदायी मानले जाते. आजकाल ऑस्टियोपोरोसिस ही समस्या अनेक लोकांमध्ये पहायला मिळते. ही समस्या होण्यामागील कारण म्हणजे हाडे कमजोर असणे होय. वयाच्या ३५ वर्षांनंतर हाडांचे मांस कमी होऊ लागते आणि हाडे कमजोर होण्यास सुरुवात होते. जर तुम्ही तीळ बारीक करुन खाल्ले आणि बिना बारीक करता खाल्ले तर त्याची न्युट्रिशन व्हॅल्यू बदलते. हाडांना



मजबूत करण्यासाठी तिळामध्ये पोषणतत्वांचे प्रमाण भरपूर असते. जर तुम्हाला शरीरावर सूज आली असेल तर तिळाच्या सेवनाने ही सूज काही प्रमाणात कमी होते किंवा या सुजेपासून आपल्याला आराम मिळतो. तिळामध्ये झिंक, सेलेनियम, कॉपर, आयरन, व्हिटॅमिन बी ६, व्हिटॅमिन ई हे मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

# मसालाकिंग धनंजय दातार यांच्यातर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट

## जनआरोग्य



करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ३ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, घराबाहेर किंवा प्रवासात प्राणवायू पुरवणारे पोर्टेबल ऑक्सिजन मशीन व ऑक्सिमीटर या उपकरणांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना धनंजय दातार म्हणाले, ''माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत''

लोकारोग्य

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

# शब्दखेळ - २६५

**खाली दिलेल्या चौकोनात**
**२ अक्षरी आडनावे लपलेली आहेत. शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | स | को | ल्हे | र | भो | ळे | बे |
| वें | प | खो | र्द | इं | ट | श्वे | दा |
| आ | का | मे | ब्ब | कृ | अं | के | का |
| क | शो | ळे | दा | जो | शे | ळी | णे |
| ब | र | रा | श | जू | ग | रा | शो |
| वें | पा | णे | धी | का | र | आ | र |
| यु | ट्या | ना | दो | चौ | दा | ते | रा |
| ध्ह | ना | सा | ने | र | ह | म | मं |

**शब्दखेळ - २६४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | कि | स | व्वा | चा | मे | ग्रॅ | म |
| र्धा | ब | उ | दा | णे | थी | री | रा |
| ण | खो | प | ट | मी | भा | ह | कि |
| ख | अ | ली | रो | ट | जी | का | लो |
| पा | ळू | ट | दा | र | ण | चे | लि |
| व | व | न | ल | ची | चे | त्ती | ट |
| स | डी | न्न | ड | झ | न | ल | र |
| दि | ड | ठ | ल | ख | भ | री | त |

## ए.एच.पोखरणा ज्वेलर्सला दिवाळीच्या खास खरेदीसाठी ग्राहकांची पसंती

# आकर्षक योजनांमुळे ग्राहकांचा दुहेरी लाभ

**समाचार/नगर-दि.२९**

दिवाळीचा उत्साह आता शिगेला पोहोचला आहे. या वातावरणात सोने, चांदी, हिरे खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल आहे. दीपावली पाडवा या मुहूर्तांसाठी ए.एच.पोखरणा ज्वेलर्सची सर्जेपुरा व स्टेशन रोडवरील नवीन दालन सज्ज झाले आहे. दोन्ही दालनात सोन्याचे दागिने खरेदीवर जितके ग्रॅम सोने तितक्या वजनाची चांदी मोफत देण्यात येत आहे. याशिवाय ग्राहकांना स्क्रॅच कार्डव्दारे सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर १० ते १०० टक्केपर्यंत सूटही मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांना मौल्यवान खरेदीचा दुहेरी आनंद मिळत आहे, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.



विश्वसनीयता आणि शुध्दतेची १७ वर्षांची परंपरा असलेल्या ए.एच.पोखरणा ज्वेलर्सच्या दोन्ही दालनात दिवाळी तसेच आगामी लग्नसराई लक्षात घेऊन दागिन्यांचे खास कलेक्शन उपलब्ध झाले आहे. याठिकाणी अस्सल डायमंडचे दागिने, सोन्याच्या दागिन्यांची मोठी व्हरायटी, प्लॅटिनमचे दागिने, चांदीचे दागिने, चांदीची भांडी, देवदेवतांच्या मूर्ती तसेच खास गिफ्ट आर्टिकल्स उपलब्ध होत आहेत. ग्राहकांना अतिशय निवांत वातावरणात त्यांची खास मौल्यवान खरेदी करता येत आहे. याठिकाणी नववधूसाठीच्या ब्रायडल दागिन्यांचेही खास कलेक्शन उपलब्ध आहे. दिवाळीतच घरातील पुढील मंगल कार्याची खरेदी करण्याकडेही ग्राहकांचा कल आहे. सध्याच्या काळात कमी वजनाच्या नाजूक कलाकुसरीच्या दागिन्यांचा ट्रेंड आहे. त्यानुसार कमी वजनाचे प्रत्येकाला भावतील असे दागिने या दालनात आहेत. ग्राहकांना त्यांच्या मनाप्रमाणे हव्या त्या डिझाईनचे दागिने उपलब्ध करून दिले जातात. याशिवाय टेंपल ज्वेलरी, इटालियन, अँटिक ज्वेलरीही उपलब्ध आहे.

२२ कॅरेट हॉलमार्क प्रमाणिक सोन्याचे दागिने व सर्वात कमी मजुरी दरासाठी पोखरणा ज्वेलर्स नावाजले जाते. मागील काही काळात हिऱ्यांच्या दागिन्यांची खरेदी आवर्जून केली जात आहे. दालनातील सर्व दागिने हॉलमार्क प्रमाणित असून सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. त्याचबरोबर चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत. ग्राहकांनी दालनात खरेदी करून आकर्षक योजनांचाही लाभ घ्यावा असे आवाहन पोखरणा ज्वेलर्सच्यावतीने करण्यात आले आहे.



# प्रतिभा पाचपुते यांचा अर्ज दाखल

**समाचार/श्रीगोंदा-दि.२९**

श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात आमदार बबनराव पाचपुते यांनी गेली ४० वर्ष प्रतिनिधीत्व करत तालुक्याचा कायापालट केला आहे. तसेच महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून अडीच वर्षाच्या कालावधीत कोट्यवधी रुपयांचा निधी श्रीगोंदा तालुक्याला मिळवून दिला असल्याने या मतदारसंघात भाजपा च्या उमेदवार प्रतिभा बबनराव पाचपुते मताधिक्याने विजयी होतील असे प्रतिपादन भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी केले.

श्रीगोंदा येथे विधानसभा मतदारसंघातील उमेदवारी प्रतिभा बबनराव पाचपुते यांना जाहीर केली. सोमवार दि. २८ रोजी साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल. भाजपाच्या उमेदवार प्रतिभा पाचपुते यांनी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ व आमदार बबनराव पाचपुते व तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला चित्रा वाघ यांचे भाषण झाले.



# अनुराधा नागवडे यांनी भरला उमेदवारी अर्ज

**समाचार/श्रीगोंदा-दि.२९**

श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार अनुराधा नागवडे यांनी आज (सोमवारी) शक्तीप्रदर्शन करत उमेदवार अर्ज दाखल केला.

अनुराधा नागवडे यांना शिवसेना ( ठाकरे गट) या पक्षाने अधिकृत उमेदवारी दिली असून त्यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी राजेंद्र नागवडे, शिवसेनेचे उपनेते साजन पाचपुते यांच्यासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यदृष्टी दिव्यांग संस्थेच्या संगीत मैफलीत रसिक मंत्रमुग्ध

# हिंदी, मराठी गीतांना श्रोत्यांची दाद

**समाचार/नगर-दि.२९**

येथील दिव्यदृष्टी दिव्यांग संशोधन व विकास संस्थेच्या वतीने शहरातील सावेडी येथील माऊली सभागृहात दिव्यांग अंध कलाकारांकडून प्रस्तुत स्वर दिपावली या अनोख्या संगीत मैफिलीत नगर कर रसिक नाहुन निघाले. रविवार दि. २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता पदमश्री पोपटराव पवार व अन्य मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करून या मेफिलीचे उद्घाटन करण्यात आले . यावेळी उद्योजक धनेश बोगावत, नवोदित सिनेअभिनेते महेश काळे, उद्योजक व प्रेरक वक्ते एन बी धुमाळ, ब्रिगेडियर राजू चावला , अहमदनगर महाविद्यालयाचे



इतिहास विभाग प्रमुख डॉ विजय कदम , सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे रिजनल मॅनेजर शैलेंद्रकुमार सिन्हा , चिफ मॅनेजर गुलदानंद गोहर , रविंद्र चिपळूणकर , अंजिक्य सुरवसे, प्रायोजक डॉ शैलेश नेमाने , डॉ रुपाली नेमाने , अकांक्षा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या संचालिका सविता काळे, सीक्यूएव्ही चे कर्नल मिलींद सावळेकर , माऊली संकुलाचे चेअरमन दिनकर घोडके, चंदुकाका सराफ अहमदनगर शाखेच्या पौर्णिमा पवार , दिव्यदृष्टिचे अध्यक्ष कृष्णा तवले, आदी मान्यवर उपस्थित होते .

पोपटराव पवार म्हणाले, दिव्यदृष्टिच्या दिव्यांग तरुणाची आपल्या दिव्यांग बांधवांच्या विकासासाठी आणि स्वावलंबी बनविण्यासाठी चालू असलेली धडपड कौतुकास्पद आहे . ही धडपड डोळस माणसांना लाजवणारी आहे . दिव्यदृष्टिच्या नियोजित संगणक प्रकल्पाच्या मदती साठी मी कुठेतरी नक्की शब्द टाकून भरीव मदत मिळवून देईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले . दिव्यांग रिक्षा चालक अप्पासाहेब गव्हाणे व अंध मेराथॉन रनर अजय धोपावकर यांचा दिव्यदृष्टि संस्थे मार्फत उपस्थित मान्यवरांचे हस्ते सन्मान करण्यात आला. या स्वर दिपावली संगीत मैफिलीत गांधर्व विश्वविद्यालय व सुगम संगीत विद्यालय द्वारा संगीत विशारद निलेश शहादेव शिंदे, सुहास नरवडे , अलका शिंदे, वर्षा पड्याळ यांनी अत्यंत सुंदर हिंदी मराठी गीते सादर कर रसिक श्रोत्यांची दाद मिळवली.




# वसुबारस निमित्त सामुदायिक गोमाता पूजन

**समाचार/नगर-दि.२९**

दीपावली सणाच्या पूर्वसंध्येला वसुबारस निमित्त आगरकर मळ्यामध्ये विश्व हिंदू परिषद अहिल्यानगर च्या वतीने गोमाता पूजन करून वसुबारस उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी आगरकर मळा,गाडळकर मळा प्रखंड मंत्री वीरेंद्र शिंदे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, शिवनेरी प्रभात शाखेचे कार्यवाह डोलारे, वासंती नगरकर, मीरा महाजनी, माजी नगरसेविका गीतांजली काळे,सागर गाडळकर आदी उपस्थित होते.

गोमातेला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्व आहे. वसुबारसच्या दिवशी गाईची पाडव्यासह संध्याकाळी पूजा करतात.घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे.या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे. वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात.असे मिरा महाजनी यांनी गोमातेचे महत्त्व व हिंदू धर्म सनातन धर्माचे महत्त्व विषद केले. प्रास्ताविक वासंती नगरकर यांनी केले. तर आभार वीरेंद्र शिंदे यांनी मानले.

## कंपनीत काम करायचे असल्यास हप्ता द्या

# देऊळगाव सिध्दीमध्ये तीन परप्रांतीय कामगारांना मारहाण

**समाचार/नगर-दि.२९**

कंपनीमध्ये काम करायचे असल्यास हप्ता म्हणून पैसे द्यावे लागतील, असे म्हणून तीन कामगारांना मारहाण केल्याची घटना देऊळगाव सिध्दी (ता. नगर) शिवारात घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुफीज महमद आत्तार महमद (वय २४, रा. मंगरोरा, ता. मुसाफिरखाना, जि. अमेठी, उत्तर प्रदेश, हल्ली रा. देऊळगाव सिध्दी) यांनी फिर्याद दिली आहे. महादेव सुर्यभान आळकुटे, दीपक मुरलीधर घायमुक्ते व दोन अनोळखी (सर्व रा. देऊळगाव सिध्दी) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

फिर्यादी व त्यांचे मित्र वडगाव तांदळी (ता. नगर) शिवारातील कंपनीत काम करतात. फिर्यादीचा मित्र महमद इबरीस इसराल याच्या हाताच्या बोटाला दुखापत झाल्याने फिर्यादी व त्यांचा दुसरा मित्र असलम फरीद अहमद हे त्याला घेऊन शनिवारी दुपारी देऊळगाव सिध्दी येथील बस स्थानका जवळील रूग्णालयात गेले होते. ते रूग्णालयासमोर उभे असताना संशयित आरोपी तेथे आले व ते म्हणाले, तुम्ही या कंपनीमध्ये काम करायचे नाही. त्यावर फिर्यादी त्यांना समजावून सांगत असताना त्याचा त्यांना राग आला. त्यांनी फिर्यादी व त्यांच्या दोन्ही मित्रांना शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

तुम्हाला जर या कंपनीमध्ये काम करायचे असेल तर आम्हाला हप्ता म्हणून पैसे द्यावे लागतील, तुम्ही जर पैसे दिले नाही तर तुम्हाला एक एकाला तलवारीने कापुन टाकू अशी जिवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यांच्यात झालेल्या झटापटीत फिर्यादीच्या खिशातील पैसे व मोबाईल गहाळ झाला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सातभाई करत आहेत.

## चिचोंडी पाटीलकर एकवटले; आरोपीस फाशीच्या शिक्षेची मागणी

# अंगणवाडी सेविकेच्या खून प्रकरणी निदर्शने

**समाचार/नगर-दि.२९**

चिचोंडी पाटील येथील नंदी मारुती वस्ती, येथे अंगणवाडी सेविका यांच्यावर मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली असून उमा महेश पवार या अंगणवाडी सेविका यांच्यावर अंगणवाडीमध्ये अमानुष अत्याचार करून त्यांचा निर्घृण खून केला व तसेच पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला सदर घटनेमुळे चिचोंडी पाटील व परिसरामध्ये असुरक्षितेचे वातावरण तयार झाले आहे. महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न तीव्र स्वरूपात निर्माण झाला असून संपूर्ण गावाच्या व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन करून निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना निवेदन देण्यात आले यावेळी सरपंच शरद पवार , सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पोटे, माजी सभापती प्रवीण कोकाटे, उपसरपंच यशोदा कोकाटे, योगीराज गाडे, अरुण म्हस्के, चंदू पवार, प्रशांत कांबळे, मच्छिंद्र खेडकर, वैभव कोकाटे, संतोष खराडे, भाऊसाहेब ठोंबरे, अंगणवाडी



संघटनेच्या सचिव स्मिता सप्रे, औटी मॅडम, अंगणवाडी सेविका नंदा पवार, अशा चांदगुडे, दौपदी कोकाटे, नंदा ससे, सुरेखा खेडकर, मंदा कळमकर, किरण खराडे, आशा ठोंबरे, मंगल शेंदूरकर, लता मुटकुटे, अनिता इंगळे, सरस्वती कोकाटे, अलका तनपुरे, कमल पवार आदीसह चिचोंडी पाटील येथील अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता खटला फास्टट्रॅक कोर्टात चालून पीडित महिलेच्या वतीने सरकारी वकील उज्वल निकम यांची नेमणूक करण्यात यावी व सदर सहा महिन्यात आरोपीला फाशीची शिक्षा तत्काळ भवी यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावे तसेच पीडित कुटुंबाची जबाबदारी ही शासनाने घेऊन कुटुंबातील लहान दोन मुलांचे शिक्षण व पालन पोषणासाठी विशेष बाब म्हणून निधी तत्काळ उपलब्ध करून द्यावा. मयताचे पती नगर जिल्हा परिषद सेवेत कंत्राटी पद्धतीने कर्मचारी म्हणून काम करत असून त्यांना शासकीय सेवेत नियमित करावे तसेच जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रासाठी सेविका व मदतनीस दोन्ही पदाची मिनी अंगणवाडीसाठी तात्काळ नियुक्त करून सर्व अंगणवाडी केंद्रात विद्युत पुरवठ्यासह सीसीटीव्ही कॅमेरे व आलाराम बसवण्यात यावे.




# जैन वात्सल्य संस्थेतर्फे फराळाचे वाटप

**समाचार/नगर-दि.२९**

समाजातील गरजू, आर्थिक दृष्ट्या दुर्बल, विधवा, वृद्ध, आणि निराधार साधर्मी बांधवांसाठी सातत्याने सहकार्य करणाऱ्या जैन वात्सल्य संस्थेने यंदा दिवाळीच्या पर्वावर आपल्या सामाजिक सेवांचे एक प्रेरणादायी उदाहरण सादर केले आहे.

दर महिन्याप्रमाणे गरजू साधर्मी कुटुंबांना किराणा आणि जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करणाऱ्या जैन वात्सल्य संस्थेने यावेळी दिवाळीच्या निमित्ताने एक विशेष उपक्रम राबवला आहे. दिवाळीच्या आनंदाचा आस्वाद गरजू बांधवांनाही घेता यावा, त्यांच्या जीवनात प्रकाशाचा एक किरण यावा, यासाठी संस्थेने या महिन्यात नेहमीच्या किराणा साहित्याबरोबर फराळासाठी लागणारी विशेष सामुग्रीही समाविष्ट केली आहे. याबरोबरच महिलांसाठी साड्यांचेही वाटप करण्यात आले.

हा वितरण सोहळा सोनल चोरडिया यांच्या हस्ते, त्यांच्या मासखमान पूर्ती निमित्त त्यांच्या मातोश्री कल्पना चोरडिया यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले संतोष भंडारी (टाकळी ढोकेश्वर) यांनी संस्थेच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक केले. सौरभ बोरा, श्रीमती प्रमिला बोरा (मुंबई), अशोक बाबूशेठ बोरा (एस.के. ज्वेलर्स), राजेश भंडारी (महावीर कन्स्ट्रक्शन), अजित बोरा (पिंपळगांवमाळवी ),गौरव जवाहर बोरा (इचलकरंजी ),संतोष बोगावत, अजय बोरा (व्ही.आर.बी. ज्वेलर्स), ॲड. विक्की मुथा, सतीश मुथा (मुथा कलेक्शन), कुणाल गुगळे (कीर्ती कलेक्शन), आणि साहिल मुथा यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्यांचे आभार मानले. ईश्वर बोरा, विजय गुगळे यांची भाषणे झाली. कार्यक्रमासविजय गुंदेचा, अशोक कोठारी, नूतन गांधी आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.


## पाहिजेत

**निर्मलनगर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अ.नगर**

यशोदानगर, भारतीय स्टेट बँकेजवळ, पाईपलाईन रोड, अ.नगर

✻ **पद** – व्यवस्थापक । ✻ **पदसंख्या** – १
✻ **शिक्षण** – बी. कॉम, एम.कॉम
✻ **अनुभव** – पतसंस्थेत वरील पदावर काम केल्याचा अनुभव

## SASE DCORATERS



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

डागा
**शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर
७५८८११५११७/ ९८२२०८१४४०

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

**दिनांक – २५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२४**



| | |
|---|---|
| VENOM THE LAST DANCE हिंदी (3D) | 10.00 AM<br>12.30 PM<br>03.00 PM<br>05.00 PM<br>08.00 PM<br>10.20 PM |
| कर्मयोगी आबासाहेब | 05.00 PM |
| विकी विद्या का वो वाला व्हिडिओ | 08.15 AM<br>02.00 PM<br>10.30 PM |
| फुलवंती | 12.00 PM<br>05.00 PM |
| VETTAIYAN हिंदी | 11.00AM<br>07.15 PM |
| जिगरा | 09.00 AM<br>02.30 PM<br>10.15 PM |
| राजा राणी | 08.00 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show — CONNPLEX — AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

धनत्रयोदशीच्या हार्दिक मन:पूर्वक शुभेच्छा!







**मा. श्री. अविनाश देडगांवकर**
**समाजसेवक**
अहिल्यानगर

## WALK-IN INTERVIEW

**CAVALRY CANTEEN AC CENTRE & SCHOOL, JAMKHED ROAD, AHMEDNAGAR 0241-2320751**

| Sr. No. | Appointment | No. of Vacancy | Qualification | Experience |
|---|---|---|---|---|
| (a) | Manager | 01 | • ESM JCO (Preferably Hony Capt./ Lt.)<br>• Civ candidates- Graduate.<br>• Basic computer knowledge<br>• Preferably one year in a similar job. | (a) Administration<br>(b) Accounting<br>(c) Computer knowledge & preferably one year experience in Management work.<br>(d) Basic knowledge of canteen services operation and supply chain. |

**Note:-** (a) ESM personals will be given preference.
(b) Appointment will be on Contractual basis.

**Date & Time of interview : 08 Nov 2024, 1000h reporting time.**
**Submission of application (optional)**
**Documents required :-**
(a) Adhaar Card (b) Address Proof
(c) Qualification Certificate. (d) Discharge Book for Ex-serviceman.
(e) Experience Certificate. (f) Typing & Computer Certificate

## UNITED PHARMA

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon



90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49

## पाहिजेत

**सोनचाफा ज्वेलरी**
शोरूमकरिता
**टॅली ऑपरेटर व सेल्सगर्ल पाहिजे.**
आकर्षक पगार
भेटा : सोनचाफा, कापड बाजार, कोहिनूर साडीसमोर, एम. जी. रोड, अहमदनगर
मोबाईल नं. :
+91 93563 52421

## बंगला विकणे आहे

**१६८० प्लॉट एरिया २१०० स्के. फूट बांधकाम असलेला बंगला विकणे आहे. (पूर्व मुखी)**
पत्ता : 'तथास्तु', श्रेयसनगर, साईनगरजवळ (गुंडू गोडाऊन मागे), बुऱ्हानगर ग्रामपंचायत हद्दीत तपोवन रोड, अहिल्यानगर
✻ संपर्क ✻
9921182783
9921631424

## प्लॉटस् विकणे

केडगाव (देवीचे) च्या मागील ६० फुटी रोडवरील ५०० बंगल्याजवळील स. नं. २०२/२/१ मधील, साधारण २ गुंठ्यांचे काही प्लॉटस् योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
9422227944

## घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा

**वृद्धत्व–कॅन्सर–अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा – शुश्रूषा. (सशुल्क)**
**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176
9011026483
7499980845
(सहयोग – स्नेहालय)


# अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर

मुख्य कार्यालय :– महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, उपनिबंधक, ता. नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. फोन नंबर : ०२४१– २३२६९१४

जा. क्र. पतसंस्था/फेडरेशन/२६८१/सन २०२४ E-mail : dist_fed@rediffmail.com दिनांक : २६/१०/२०२४

## स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

ज्याअर्थी **पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नगर, ता. जिल्हा अहमदनगर.** यांनी खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असून, त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे. तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरून मी **एम. ए. शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमूद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण/दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार, गहाण, दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द/निरर्थक ठरतील.

| अ. नं. | थकबाकीदारांचे नाव | गाव | स्थावर मिळकत | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा. रक्कम | गट नं./प्लॉट नं./ मिळकत नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पै. | चतु:सीमा | | | |
| | | | | | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्जदार – १) चव्हाण नरेश निलदास यांची मिळकत<br>कर्ज – २) चव्हाण रिता नरेश<br>कर्ज – ३) चव्हाण नलिनी सुरेश<br>जामि – लालबेग संदिप उस्मान<br>जामि – चव्हाण जय अर्जुन | बुऱ्हाणनगर, ता. नगर | २२३५८३१/– + इतर खर्च + होणारे व्याज | ११५/१/२/प्लॉट ४८ पैकी | ०.९३ पैकी | ९.३० | मूळ नकाशाप्रमाणे | | | |
| २ | कर्जदार – राहुल रमेश कुलकर्णी करिता<br>जामि – रमेश कृष्णाजी कुलकर्णी यांची मिळकत<br>जामि – धोंडीराम भगवान कांबळे<br>जामि – समर्थ चंद्रकांत बिडकर | कामठी, ता. श्रीगोंदा | ३८२८९/– + इतर खर्च + होणारे व्याज | ७६ पैकी | ६.९६ पैकी | ५.८७ | मूळ नकाशाप्राणे | | | |
| ३ | कर्जदार – गौरी केशव काळे करिता<br>जामि – केशव भाऊसाहेब काळे यांची मिळकत<br>जामि – राजाराम रामदास पाटील | सारोळा कासार, ता. नगर | ५०१७१२३/– + इतर खर्च + होणारे व्याज | ३४२ | १.९६ | २.00 | मूळ नकाशाप्रमाणे | | | |
| ४ | कर्जदार – सुनिल अर्जुन लालबोंद्रे यांची मिळकत व करिता<br>जामि – महेश राजाराम नामदे यांची मिळकत<br>जामि – श्रीकांत लक्ष्मीकांत नांगरे | नागरदेवळे<br>भिंगार, ता. नगर | १६९७२९०/– + इतर खर्च + होणारे व्याज | २८२/३/प्लॉट ४४ पैकी<br>१९०/२ पैकी | १.५७.५० पैकी<br>0.११ पैकी | १६.00<br>0.१५ | मूळ नकाशाप्रमाणे | | | |

हा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांच्या आत वसूल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसूल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहीर लिलावाने विक्री करून ही वसूल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडून वरीलप्रमाणे प्राधान्याने वसुली केली जाईल, याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २६/१०/२०२४

शिक्का

**एम. ए. शेख**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी,**
**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर**